मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चाकण-तळेगाव महामार्गावर प्रशासन ॲक्शन मोडमध्ये!

## महामार्गावरील अवजड वाहनांवर कारवाई; ५० हून अधिक वाहने हटवली

» पिंपरी | प्रतिनिधी

**चाकण तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला होणाऱ्या अवजड वाहनांच्या अनधिकृत पार्किंगवर कारवाई करत आता वाहतूक प्रशासन 'ॲक्शन' मोड मध्ये आले आहे. या अंतर्गत कालपासून तब्बल ५० हून अधिक अवजड वाहनांना टो करून इतरत्र स्थलांतरीत करण्याबरोबरच त्यांच्याकडून चलन वसूली करण्यात येत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी दिली.**



### चाकण-तळेगाव महामार्गावर धडक कारवाई

वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि अवजड वाहनांच्या अनधिकृत पार्किंगवर उपाययोजनांचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले होते. त्यानुसार वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू केली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील दिवसेंदिवस वाढत असलेली वाहतूक कोंडी, रस्त्यांची झालेली दुरवस्था, महामार्गाच्या दुतर्फा होणारे अवजड वाहनांचे अनधिकृत पार्किंग तसेच विविध ठिकाणी झालेले अतिक्रमण यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी काही दिवसांपूर्वी संबंधित प्रशासनाला दिले होते. या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरळीत करण्यासाठी सदर कारवाई करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

चाकण-तळेगाव औद्योगिक परिसरात मोठ्या संख्येने उद्योग, कंपन्या आणि विविध व्यावसायिक आस्थापना कार्यरत आहेत. त्यामुळे दररोज हजारो कामगारांची ये-जा होत असते. त्याचबरोबर मालवाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक या मार्गावर सुरू असते. वाहनांची वाढती संख्या आणि रस्त्याच्या कडेला होणारे अनधिकृत पार्किंग यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीचा वेग मंदावून मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होत आहे.

ही वाहतूक कोंडी कमी करून वाहनचालक तसेच कामगारांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रशासनाच्या वतीने आता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. अनधिकृतपणे वाहने पार्क न करण्याचे आवाहन संबंधित वाहनचालक आणि वाहतूकदारांना करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी नमूद केले.

# खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण! काळेवाडी-रहाटणीत जनआंदोलनाचा इशारा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**काळेवाडी, रहाटणी आणि परिसरातील प्रमुख रस्त्यांवर पावसामुळे मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्यावरील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असून, अनेक नागरिक जखमी झाल्याचा दावा करण्यात येत आहे.**





### खड्डे बुजवा, अन्यथा आंदोलन!

काळेवाडी-रहाटणी परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाचे पाणी साचल्याने खड्डे अधिक धोकादायक झाले असून, दुचाकीस्वारांच्या अपघातांचा धोका वाढला आहे. महापालिकेने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती न केल्यास खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर यांनी दिला आहे.

काळेवाडी, रहाटणी, विजयनगर, तापकीरनगर, भारतमाता चौक, नढेनगर, कोकणेनगर, पाचपीर चौक, आदर्शनगर आणि ज्योतिबानगर परिसरातील रस्त्यांची अवस्था गंभीर झाली आहे. पावसाळ्यात या रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहनचालकांना वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी तर खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे.

या परिसरातील रस्त्यांचा वापर दररोज हजारो नागरिक करत आहेत. कामानिमित्त प्रवास करणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच दुचाकीस्वारांना या खराब रस्त्यांमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी वाहनांची वाहतूकही मंदावली असून, खड्डे चुकवताना वाहनचालकांकडून अचानक ब्रेक लावले जात असल्याने किरकोळ अपघातांची शक्यता वाढली आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही यामुळे गंभीर बनला आहे. विद्यार्थ्यांना दररोज या खड्ड्यांमधून मार्ग काढत शाळेत जावे लागत आहे. पावसाचे पाणी आणि चिखलामुळे रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने केवळ तात्पुरती डागडुजी न करता खराब रस्त्यांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर यांनी या प्रश्नाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून रस्ते वाहतुकीसाठी सुरक्षित करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असूनही प्रशासनाकडून विलंब होत असल्यास त्याविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

“रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात आली नाही, तर या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येईल. त्यानंतरही समस्या सोडविण्यात आली नाही तर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल,” असा स्पष्ट इशारा मच्छिंद्र तापकीर यांनी दिला आहे.

त्यामुळे काळेवाडी-रहाटणी परिसरातील खराब रस्ते आणि खड्ड्यांचा प्रश्न आता पुन्हा ऐरणीवर आला असून, महापालिका प्रशासनाकडून यावर तातडीने कोणती कार्यवाही केली जाते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भाजप ओबीसी मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीत पिंपरी-चिंचवडला महत्त्व!

## शितल शिंदे यांची प्रदेश सरचिटणीसपदी, तर मनोज ब्राह्मणकर यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची नवी घोषणा करण्यात आली असून, पिंपरी-चिंचवडमधील नगरसेवक शितल शिंदे यांची महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी, तर मनोज ब्राह्मणकर यांची महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या दोन्ही नियुक्त्यांमुळे पिंपरी-चिंचवडला प्रदेश पातळीवरील संघटनात्मक कामकाजात महत्त्वाचे स्थान मिळाले असून, आगामी काळात ओबीसी मोर्चाच्या संघटन विस्ताराला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**





भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी योगेश सागर आणि प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चाच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या कार्यकारिणीत विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी अनुभवी कार्यकर्त्यांवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

शितल शिंदे यांनी पक्ष संघटन, सामाजिक कार्य तसेच ओबीसी समाजाशी संबंधित विविध प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. स्थानिक पातळीवर नागरिकांशी असलेला संपर्क आणि संघटनात्मक अनुभव यामुळे त्यांच्यावर प्रदेश सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे मानले जात आहे. प्रदेश पातळीवर काम करताना ओबीसी मोर्चाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच राज्यातील विविध भागांमध्ये पक्षाच्या विचारधारेचा विस्तार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

दरम्यान, मनोज ब्राह्मणकर यांची प्रदेश कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग घेत त्यांनी पक्षनिष्ठा आणि कार्यक्षमतेची छाप निर्माण केली आहे. कोषाध्यक्ष म्हणून मोर्चाच्या आर्थिक नियोजनासह विविध संघटनात्मक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीत त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

ओबीसी समाजातील विविध प्रश्न, सामाजिक व शैक्षणिक विषय, रोजगाराच्या संधी तसेच समाजाच्या संघटनात्मक सक्षमीकरणासाठी भाजप ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. नव्या प्रदेश कार्यकारिणीच्या माध्यमातून या कामाला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

शितल शिंदे आणि मनोज ब्राह्मणकर यांची प्रदेश कार्यकारिणीत नियुक्ती झाल्याची माहिती समोर आल्यानंतर पिंपरी-चिंचवडमधील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सामाजिक संस्था, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून दोघांचे अभिनंदन करण्यात येत असून, नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

या नियुक्त्यांमुळे पिंपरी-चिंचवडमधील भाजप ओबीसी मोर्चाच्या कार्यकर्त्यांना प्रदेश पातळीवर काम करण्याची अधिक संधी मिळणार असून, आगामी काळात संघटन विस्तार, जनसंपर्क आणि सामाजिक उपक्रमांना अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पिंपरी-चिंचवडला प्रदेशात महत्त्वाची जबाबदारी!

भाजप ओबीसी मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीत नगरसेवक शितल शिंदे यांची प्रदेश सरचिटणीसपदी, तर मनोज ब्राह्मणकर यांची प्रदेश कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे पिंपरी-चिंचवडमधील ओबीसी मोर्चाच्या संघटनात्मक कार्याला प्रदेश पातळीवर अधिक बळ मिळणार आहे. आगामी काळात ओबीसी समाजातील विविध प्रश्नांवर काम करताना तसेच पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी दोन्ही पदाधिकारी महत्त्वाची भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# दिघीतील हॉटेलमध्ये हुक्क्याचा धूर; चौघांवर गुन्हा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**दिघीतील मॅग्झीन रोड परिसरातील एका हॉटेलमध्ये ग्राहकांना हर्बल हुक्का तसेच तंबाखू हुक्का पुरविल्याप्रकरणी चौघांविरुद्ध दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हॉटेलमध्ये स्वतंत्र स्मोकिंग झोनची व्यवस्था नसतानाही ग्राहकांना जेवणाच्या टेबलवरच हुक्का उपलब्ध करून दिल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील हॉटेलमध्ये नियमांचे पालन करण्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास मॅग्झीन रोड, दिघी येथील हॉटेल ट्री टाऊनमध्ये ही कारवाई करण्यात आली. हॉटेलमध्ये ग्राहकांना हुक्का पुरविला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी पाहणी केली. त्यावेळी हॉटेलमध्ये हुक्का सेवा सुरू असल्याचे निदर्शनास आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या प्रकरणी पोलीस शिपाई सोमनाथ बाळू खळसोडे यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अक्षय तापकीर, समशेर मनसुर अहमद, किशन कुमार श्रवण साहनी आणि अरबाज इम्रान अहमद या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, संबंधित आरोपी हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना हर्बल हुक्का, तंबाखू हुक्का यासोबत स्नॅक्स, पाणी आणि शीतपेय उपलब्ध करून देत होते. ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी आवश्यक साहित्य आणि सुविधा हॉटेलमध्येच उपलब्ध करून दिल्याचेही पोलिसांनी नमूद केले आहे.

कारवाईदरम्यान हॉटेलमध्ये हुक्क्यासाठी फॉईल पेपरवर जळता कोळसा ठेवण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. हुक्क्याचा धूर हॉटेलच्या परिसरात पसरलेला होता. तसेच परिसरात हुक्का फ्लेवरचा वास येत असल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ग्राहकांच्या ये-जा करण्याच्या ठिकाणी जळता कोळसा नेला जात असल्याने ठिणग्या उडण्याची शक्यता होती. त्यामुळे हॉटेलमधील लाकडी टेबल, फर्निचर आणि इतर ज्वलनशील साहित्याला आग लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत आग लागल्यास ग्राहकांसह हॉटेलमधील कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

हॉटेलमध्ये स्वतंत्र स्मोकिंग झोनची व्यवस्था न करता ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे संबंधित नियमांचे उल्लंघन झाल्याच्या कारणावरून पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिघी परिसरातील हॉटेल आणि खाद्यपदार्थांच्या आस्थापनांमध्ये अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन होत आहे का, याबाबतही पोलिसांकडून तपास केला जात आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वरे करीत आहेत. तपासादरम्यान हुक्का सेवा, त्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच संबंधित परवानग्या आणि नियमांचे पालन याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# हायकोर्टाचा दणका! 13 स्वच्छता निरीक्षक 'बेकायदेशीर'

## शासनमान्यता नसलेल्या संस्थेच्या प्रमाणपत्रांमुळे नियुक्त्यांवर गंडांतर

**पुणे | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्वच्छता निरीक्षक पदासाठी नियुक्त करण्यात आलेल्या १३ उमेदवारांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांवर मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित करत त्यांच्या नियुक्त्या बेकायदेशीर ठरवल्या आहेत. 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट' या संस्थेमार्फत चालविण्यात येणारा स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम शासनमान्य नसल्याचे न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट झाले आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेने ३० ऑगस्ट २०२४ रोजी स्वच्छता निरीक्षक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. या भरती प्रक्रियेत काही उमेदवारांनी विविध संस्थांमार्फत पूर्ण केलेल्या स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे सादर केली होती. मात्र, संबंधित अभ्यासक्रम आणि संस्थांच्या शासनमान्यतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर हे प्रकरण न्यायालयात पोहोचले.

या प्रकरणातील उमेदवार चेतन बोरसे यांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर संबंधित संस्थेच्या मान्यतेचा मुद्दा समोर आला. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या माहितीनुसार, 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट'सह राज्यातील १०० हून अधिक संस्थांविरोधात अनधिकृत संस्था म्हणून कारवाई सुरू असल्याचे न्यायालयाला कळविण्यात आले.

या संस्थेच्या मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड यांसह विविध ठिकाणच्या शाखांमधून स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचा आरोप आहे. शासनाची आवश्यक मान्यता नसताना अभ्यासक्रम चालविण्यात आल्यास हजारो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे अशा प्रमाणपत्रांच्या आधारे विविध शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोकरी मिळवलेल्या कर्मचाऱ्यांमध्येही चिंता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी त्या संस्थेला आणि संबंधित अभ्यासक्रमाला शासनाची अधिकृत मान्यता आहे की नाही, याची खात्री करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाकडून अनधिकृत संस्थांविरोधात २०१३ च्या अधिनियमांतर्गत कारवाई सुरू असून, काही संस्थांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. 'ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट' संस्थेबाबतही कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. या संस्थेचा स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम बंद करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.

याशिवाय 'भारत सेवक समाज'सह अन्य काही संस्थांचीही चौकशी सुरू असून, अनधिकृतपणे अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांविरोधात कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा संस्थांमार्फत अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांचे भवितव्य आणि त्यावर आधारित झालेल्या नियुक्त्यांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

### अनधिकृत संस्थांपासून सावधान!

शासनाची मान्यता नसलेल्या संस्थांमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित संस्था व अभ्यासक्रमाला अधिकृत मान्यता आहे की नाही, याची खात्री करा. विद्यार्थ्यांनी व पालकांनी शासनमान्य संस्थांमध्येच प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनमान्यतेशिवाय अभ्यासक्रम चालवून विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पालक आणि विद्यार्थ्यांकडून होत आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी संस्थेची अधिकृत मान्यता तपासण्याचे आवाहन संबंधित विभागाकडून करण्यात येत आहे.

# साखर महागली; आता १५ ऑक्टोबरपासून गाळप सुरू करण्याची तयारी



**पुणे | प्रतिनिधी**

**देशात साखरेच्या दरात अचानक वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर बाजारातील उपलब्धता वाढविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी यंदाचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्याची तयारी दर्शवली आहे. राज्य सरकारने परवानगी दिल्यास लवकर गाळप सुरू करून ऐन सणासुदीच्या काळात बाजारात अतिरिक्त साखर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, सध्याच्या साखरेच्या दरवाढीचा सहकारी साखर कारखानदारीला कोणताही विशेष फायदा झालेला नाही. उलट, कारखान्यांची आर्थिक तरलता कमी असल्याने हंगामपूर्व खर्चासाठी सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

लवकर गाळप सुरू केल्यामुळे साखर उताऱ्यात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळावी, तसेच ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये उत्पादित आणि विक्री होणाऱ्या साखरेवरील जीएसटी माफ करावा, अशी मागणी महासंघाने केली आहे.

साखरेचा उत्पादन खर्च सुमारे ४३ रुपये प्रतिकिलो असल्याचे सांगत केंद्र सरकारने साखरेची किमान विक्री किंमत (MSP) ४३ रुपये प्रतिकिलो निश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. यामुळे साखर साठ्याचे मूल्यांकन वाढून कारखान्यांना अतिरिक्त कर्ज मिळण्यास मदत होईल, असा दावा महासंघाने केला आहे.

दरम्यान, साखरेच्या दरवाढीसाठी इथेनॉल उत्पादनाला जबाबदार धरणारा प्रचार महासंघाने फेटाळला आहे. इथेनॉल पुरवठ्यात साखर उद्योगाचा वाटा ८६ टक्क्यांवरून घटून २८ टक्क्यांवर आला असल्याने सध्याच्या दरवाढीचा इथेनॉलशी थेट संबंध नसल्याचे महासंघाने स्पष्ट केले.

यंदाचा २०२६-२७ चा ऊस गाळप हंगाम ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार असून, नवीन हंगामात उत्पादित होणारी साखर बाजारात अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सणासुदीच्या काळात साखरेची मागणी वाढणार असल्याने १५ ऑक्टोबरपासून गाळप सुरू झाल्यास बाजारातील साखरेची उपलब्धता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात साखरेच्या दरावर याचा कितपत परिणाम होतो, याकडे ग्राहकांसह साखर उद्योगाचे लक्ष लागले आहे.

### १५ ऑक्टोबरपासून गाळपाची तयारी

साखरेच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबर २०२६ पासून ऊस गाळप हंगाम सुरू करण्याची तयारी करण्यात आली आहे. सणासुदीतील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी बाजारात लवकर साखर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. दरम्यान, देशात साखरेचा पुरेसा शिलकी साठा उपलब्ध असून, साखरेची किमान विक्री किंमत ४३ रुपये प्रतिकिलो निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### देशात साखरेचा पुरेसा साठा

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) देशात साखरेचा पर्याप्त शिलकी साठा उपलब्ध असल्याचा दावा केला आहे. विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे आणि कार्यकारी संचालक अजित चौगुले यांनी सांगितले की, खासगी साखर कारखाने केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व निर्देशांचे पालन करीत आहेत.

# राहुल गांधींचा दावा; "भारतातील 80 टक्के महिलांची दररोज कुचंबणा"

## पुण्यात १८ हजार तरुणींशी संवाद; महिला हक्कांवर राहुल गांधींचे भाष्य

**पुणे | प्रतिनिधी**

**भारतातील महिलांच्या सुरक्षिततेचा आणि समान हक्कांचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुण्यात आयोजित 'छात्रो की गुंज' कार्यक्रमात केंद्र सरकारसह सामाजिक व्यवस्थेवर जोरदार टीका केली. पुण्यातील नगररोड परिसरातील एका खासगी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात देशभरातून आलेल्या सुमारे १८ हजार तरुणींशी त्यांनी संवाद साधला.**



शनिवारी सायंकाळपासून कार्यक्रमस्थळी देशभरातून आलेल्या तरुणींची मोठी गर्दी झाली होती. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रात्री सुमारे ७.२० वाजता राहुल गांधी यांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाले. त्यावेळी उपस्थित तरुणींनी मोबाइलचे टॉर्च सुरू करून राहुल गांधी यांच्या नावाचा जयघोष केला. उत्साही वातावरणात राहुल गांधी यांनी तरुणींशी थेट संवाद साधण्यास सुरुवात केली.

"मी तुमच्याशी केवळ संवाद साधण्यासाठी आलो नाही, तर तुमची मानसिकता, तुमचे प्रश्न आणि तुमचे जीवन कसे चालले आहे हे समजून घेण्यासाठी आलो आहे," असे राहुल गांधी यांनी सांगितले. महिलांच्या सामाजिक स्थितीवर भाष्य करताना त्यांनी मनुस्मृतीतील कथित विचारांचा संदर्भ दिला. महिलांना पुरुषांच्या अधीन ठेवणारी मानसिकता चुकीची असून, महिलांना समान अधिकार, स्वातंत्र्य आणि निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राहुल गांधी यांनी महिलांवरील अत्याचार, असुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक भेदभावाशी संबंधित विविध आकडेवारी कार्यक्रमात मांडली. त्यांच्या दाव्यानुसार, देशातील मोठ्या संख्येने महिला आजही मानसिक, आर्थिक आणि शारीरिक अडचणींचा सामना करत आहेत. अनेक महिला असुरक्षिततेच्या भावनेमुळे घराबाहेर पडण्यासही घाबरतात. तसेच महिलांच्या नावावर संपत्तीचे प्रमाण कमी असून, आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी त्यांना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या महाविद्यालयीन तरुणींशी राहुल गांधी यांनी संवाद साधला. घरातील निर्णयप्रक्रियेत महिलांना समान अधिकार मिळतात का, मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जातो का, तसेच समाजात महिलांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याबाबत त्यांनी तरुणींना प्रश्न विचारले.

यावेळी काही तरुणींनीही मोकळेपणाने आपल्या अनुभवांची माहिती दिली. घरात अजूनही भावाच्या तुलनेत मुलींना दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण, करिअर, विवाह आणि वैयक्तिक निर्णय घेताना महिलांना कुटुंब तसेच समाजाकडून विविध प्रकारच्या दबावाला सामोरे जावे लागत असल्याचेही काही तरुणींनी राहुल गांधी यांच्या निदर्शनास आणून दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या वक्तव्यांचे व्हिडिओ दाखवत त्यांच्यावर टीका केली. महिलांबाबतची राजकीय आणि सामाजिक भूमिका यावरून त्यांनी सत्ताधारी व्यवस्थेला लक्ष्य केले. महिलांच्या प्रश्नांवर केवळ भाषणे न करता त्यांच्या सुरक्षितता आणि समान हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांचा सन्मान, समान हक्क आणि सुरक्षितता यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

### तरुणींनी मांडल्या व्यथा!

पुण्यातील संवाद कार्यक्रमात महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या तरुणींनी राहुल गांधी यांच्यासमोर घरातील भेदभाव, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, शिक्षण, करिअर आणि सामाजिक दबावाबाबत आपले अनुभव मांडले. भावाच्या तुलनेत मुलींना दुय्यम वागणूक मिळत असल्याचेही काही तरुणींनी सांगितले. राहुल गांधी यांनी तरुणींचे प्रश्न ऐकून महिला समानता आणि सुरक्षिततेसाठी मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली.

महिलांना घरापासून राजकारणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात निर्णयप्रक्रियेत समान स्थान मिळाले पाहिजे. तसेच महिलांना कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागू नये, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडली. पुण्यातील या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणींशी थेट संवाद साधत महिला प्रश्न, सामाजिक समानता आणि महिलांच्या स्वातंत्र्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

---

# महायुतीतील धुसफूस; सभागृहनेते बिडकरांची सुनेत्रा पवारांकडे तक्रार

**पुणे | प्रतिनिधी**

**राज्यात महायुतीच्या माध्यमातून सत्तेत असलेल्या भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये महापालिकेमध्ये धुसफूस वाढली आहे. राष्ट्रवादीचे नगरसेवक अमोल बालवडकर आणि नगरसेवक सुहास टिंगरे यांचा विकास निधी काढून घेतल्यानंतर सभागृह नेते गणेश बिडकर यांनी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांची थेट उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे तक्रार केली आहे.**



राज्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या माध्यमातून सत्तेत आहेत. मात्र, पुणे महापालिकेत सत्ताधारी आणि विरोधकाच्या भूमिकेत आहेत. मात्र निवडणुकीपूर्वी नगरसेवक अमोल बालवडकर आणि भाजपा नेत्यांमध्ये झालेल्या मतभेदाचे प्रतिबिंब महापालिकेत पाहायला मिळते. सुनेत्रा पवार यांना पाठवलेल्या पत्रात बिडकर यांनी म्हटले आहे की, महापालिकेत सामंजस्याने काम करण्याची भाजपची भूमिका आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना सभागृहात बोलण्यासाठी पुरेसा वेळ तसेच विकासकामांसाठी निधी दिला जातो. फेब्रुवारी ते जुलै या कालावधीत झालेल्या मुख्य सभांमध्ये भाजपच्या १२६ सदस्यांना १,१६० मिनिटे, तर राष्ट्रवादीच्या २७ सदस्यांना ५०६ मिनिटे बोलण्याची संधी दिली आहे. त्यानुसार भाजपच्या एका सदस्याला सरासरी नऊ, तर राष्ट्रवादीच्या सदस्याला १८ मिनिटे वेळ मिळाल्याचा दावा बिडकर यांनी केला आहे.

नगरसेवक बालवडकर यांनी ११ ऑगस्ट रोजी झालेल्या हर घर तिरंगा उपक्रमातील रॅलीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील आणि महापौर मंजूषा नागपुरे यांच्यावर टीका केली. तसेच ७ ऑगस्ट रोजी बालवडकर आणि टिंगरे यांनी कोथरूड मतदारसंघातील आमदार निधीतून झालेल्या कामांच्या चौकशीसाठी दिलेल्या ठरावातून चंद्रकांत पाटील यांना लक्ष्य केले.

१८ ऑगस्टच्या मुख्य सभेत नियमांनुसार विषय दाखल करण्यास बालवडकर यांनी विरोध करून कामकाजात अडथळा आणल्याचा आरोपही बिडकर यांनी केला आहे. बालवडकर यांची भूमिका असंसदीय आणि हेकेखोर असल्याचा ठपका त्यांनी ठेवला आहे. पक्षाच्या नेतृत्वावर वारंवार होणारी टीका मान्य नसल्याचे स्पष्ट करत बिडकर यांनी या संपूर्ण प्रकाराची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना दिली आहे. पत्राच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### महायुतीतील धुसफूस चव्हाट्यावर!

पुणे महापालिकेतील भाजप–राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत वाद आता वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचला आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांविरोधातील तक्रारीचे पत्र उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना पाठविण्यात आले आहे.